अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । बुधवार, दि. १२ नोव्हेंबर २०२५ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : ४४ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

## घाबरून कोसळलेल्या वृद्धाचा रुग्णालयात मृत्यू

**सोलापूर :** रिक्षाचे टायर फुटल्याच्या आवाजाने घाबरून कोसळून गंभीर जखमी झालेले पादचारी वृद्ध शासकीय रुग्णालयात उपचार घेताना आज मंगळवारी सकाळी मरण पावले. मुकुंद तुकाराम राजकडे (वय ७३, रा.१८० राजीव गांधीनगर सोलापूर) असे त्या मयत वृद्धाचे नाव आहे. ते १४ ऑक्टोबर रोजी दुपारी स्वागत नगर येथे पाई जात होते. त्यावेळी त्यांच्या बाजूने जाणाऱ्या रिक्षाचे टायर अचानक फुटले. त्याच्या आवाजाने ते घाबरून जमिनीवर कोसळून गंभीर जखमी झाले होते. त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल केले असता ते मंगळवारी सकाळी मयत झाले.अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

## दुचाकीवरून कोसळून जखमी झालेल्या चालकाचा अखेर मृत्यू

**सोलापूर :** दुचाकी वरून डबलसीट जात असताना अचानक टायर बर्स्ट होऊन कोसळून जखमी झालेला इसम शासकीय रुग्णालयात उपचार घेताना सोमवारी रात्री मयत झाला. सुशील भीमराव सोनटक्के (वय ४०, दक्षिण सोलापूर) असे त्या मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. ते आणि हैदर रजाक शेख (वय ४५, रा. सदर) हे दोघे मोटार सायकल वरून कंदलगाव ते कोलेवस्ती कडे निघाले होते. कंदलगावाजवळ दुचाकीचे समोरील टायर अचानक फुटले. त्यामुळे दोघेजण खाली पडून जखमी झाले होते. त्यांना उपचाराकरिता शासकीय रुग्णालयात रमेश बनसोडे (मित्र) यांनी दाखल केले होते. त्यापैकी सुशील हे उपचारादरम्यान सोमवारी मयत झाले.

# महापालिका आरक्षणात उलथापालथ

# ३४ माजी नगरसेवकांवर गंडांतर

**सोलापूर : सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी मंगळवारी प्रभाग आरक्षण सोडत काढण्यात आली. या सोडतीमध्ये मोठी उलथापालथ झाली असून यामध्ये सन २०१७ च्या महापालिका निवडणुकीच्या तुलनेत एकूण ३४ जागांवर आरक्षण बदल झाले आहेत. त्यामुळे राजकीय गणित बदलणार आहे. दहा प्रभाग पूर्णपणे जैसे थे आहेत. दोन प्रभागांमध्ये संपूर्ण बदल झाला आहे. यामुळे बदल झालेल्या ३४ माजी नगरसेवकांना इतरत्र जागांवर निवडणूक लढवावी लागणार आहे. आरक्षण बदलाचा हा फटका काहीजणांना बसला आहे.**



अधिक वृत्त पान ३ आणि ८वर

▸▸ अनेकांना नवा प्रभाग शोधावा लागणार

▸▸ काहींना सेफ झोन तर काहींना अनिश्चितता

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी एकूण १०२ जागांकरिता मंगळवारी आरक्षण सोडत महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. एकूण २६ प्रभागांपैकी २४ प्रभाग हे चार सदस्यीय आहेत. तर दोन प्रभागात प्रत्येकी तीन सदस्य राहणार आहेत. सन २०१७ मध्ये झालेल्या सोलापूर महापालिका निवडणुकीच्या तुलनेत यंदाच्या या यंदा एकूण ३४ जागांवर आरक्षणामध्ये बदल झाला आहे. यामुळे प्रस्थापितांना याचा फटका बसणार आहे. यातील काहीजणांना त्याच प्रभागातील सर्वसाधारण, ओबीसी जागेवर चाचपणी करावी लागणार आहे.

एकूण दहा प्रभाग हे जैसे थे राहिले आहेत. त्यामुळे या दहा प्रभागातील ४० जागांवरील माजी नगरसेवकांना सेफ झोन असल्याचे दिसते. १४ प्रभागातील प्रत्येकी दोन जागी जैसे ते आरक्षण पडले आहे. अशा पद्धतीने ६८ जागांवरील माजी सदस्य यांना कोणताही धोका नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्याच प्रभागातून ते निवडणूक लढवू शकतील असे चित्र आहे. प्रभाग क्रमांक २५ आणि २६ मधील प्रत्येकी तीन जागांवरील आरक्षणात संपूर्ण बदल झाला आहे.

### या प्रभागात आहे, आरक्षण जैसे थे

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या सोडत आरक्षणामध्ये दहा प्रभागांमध्ये सर्व आरक्षण जैसे थे आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक एक, दोन, चार, सात, नऊ, दहा, बारा, पंधरा, सतरा, अठरा या प्रभागांचा समावेश आहे. तर १४ प्रभागातील दोन जागांवर आरक्षण बदल झाला नसून यामध्ये प्रभाग क्रमांक तीन, प्रभाग पाच, प्रभाग सहा, प्रभाग आठ, प्रभाग ११, प्रभाग १३, प्रभाग १४, प्रभाग १६, प्रभाग १९, प्रभाग २०, २१, २२, २३, २४ हे आहेत.

### ३४ जागी आरक्षण बदल; हे आहेत माजी नगरसेवक

नुकत्याच झालेल्या आरक्षण सोडतीमध्ये ३४ जागांच्या आरक्षणामध्ये बदल झाला आहे. त्यातील माजी नगरसेवक आणि बदल झालेले सध्याचे प्रभाग आरक्षण असेः सूर्यकांत पाटील– प्रभाग तीन अ नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, अंबिका पाटील– प्रभाग तीन क सर्वसाधारण, स्वाती आवळे– प्रभाग पाच अ अनुसूचित जाती, गणेश पुजारी– प्रभाग पाच ब नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, मनोज शेजवाल – प्रभाग ६ अ अनुसूचित जाती महिला, ज्योती खटके– प्रभाग ६ ब नागरिकांचा मागास प्रवर्ग, अमर पुदाले– प्रभाग आठ अ नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, सोनाली मुटकीरी – प्रभाग आठ क सर्वसाधारण, राजकुमार हंचाटे– प्रभाग ११ अ नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, रिक्त – प्रभाग ११ क, (दिवंगत) सुनील कामाठी निवडून आले होते (प्रभाग १३ अ अनुसूचित जाती महिला), प्रतिभा मुदगल– प्रभाग क्रमांक १३ ब नागरिकांचा मागास प्रवर्ग, वहिदाबानो शेख– प्रभाग १४ ब नागरिकांचा मागास प्रवर्ग, तौफिक हत्तुरे – प्रभाग क्रमांक १४ क सर्वसाधारण महिला, मीनाक्षी कंपली – प्रभाग क्रमांक १६ अ अनुसूचित जाती, नरसिंग कोळी – प्रभाग १६ ब नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, श्रीनिवास करली– प्रभाग १९ अ नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, अनिता कोंडी– प्रभाग क्रमांक १९ ब नागरिकांचा मागास प्रवर्ग, प्रवीण निकाळजे– प्रभाग २० अ नागरिकांचा मागास प्रवर्ग, अनुराधा काटकर – प्रभाग वीस ब सर्वसाधारण महिला, तौफिक शेख – २१ अ अनुसूचित जाती महिला, तसलीम शेख– प्रभाग क्रमांक २१ ब नागरिकांचा मागास प्रवर्ग, पूनम बनसोडे– प्रभाग क्रमांक २२ अ अनुसूचित जाती, किसन जाधव – प्रभाग २२ ब नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, सुनिता रोटे – प्रभाग क्रमांक २३ अ अनुसूचित जाती, लक्ष्मण जाधव – प्रभाग २३ क सर्वसाधारण महिला, संगीता जाधव– प्रभाग २४ अ अनुसूचित जाती, माजी उपमहापौर राजेश काळे – प्रभाग २४ ब अनुसूचित जमाती महिला, सुभाष शेजवाल– प्रभाग २५ अ अनुसूचित जाती महिला, मनिषा हूचे– प्रभाग क्रमांक २५ ब नागरिकांचा मागास प्रवर्ग, वैभव हत्तुरे– प्रभाग क्रमांक २५ क सर्वसाधारण महिला, शिवलिंग कांबळे– प्रभाग क्रमांक २६ अ अनुसूचित जाती महिला, प्रभाग क्रमांक २६ ब अनुसूचित जमाती, प्रिया माने– प्रभाग क्रमांक २६ क सर्वसाधारण आदी.

## एनडीएची गाडी सुसाट, महागठबंधनची पिछेहाट


**पाटणा :** बिहार विधानसभा निवडणुकीत भाजप-संयुक्त जनता दल प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी अर्थात एनडीएला स्पष्ट बहुमत मिळण्याचा अंदाज जवळपास सगळ्याच एक्झिट पोलमधून वर्तवण्यात आला आहे. बिहारमध्ये यंदा दोन टप्प्यात मतदान झाले. ६ आणि ११ नोव्हेंबरला मतदारांनी त्यांचा कौल दिला. १४ नोव्हेंबरला निकाल जाहीर होणार आहे. एक्झिट पोलमधील आकडे पाहता सत्ताधारी एनडीएला स्पष्ट बहुमत मिळेल असा अंदाज आहे. माजी मुख्यमंत्री लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाच्या नेतृत्वात लढणाऱ्या महागठबंधनला झटका बसण्याची शक्यता आहे.

बिहारमध्ये यंदा बंपर मतदान झाले आहे. मॅटराईझच्या एक्झिट पोलनुसार एनडीएला १४७ ते १६७ जागा मिळण्याचा अंदाज आहे. तर महागठबंधनला ७० ते ९० जागा मिळतील अशी शक्यता आहे. राज्यात विधानसभेच्या एकूण २४३ जागा असून सत्ता स्थापनेसाठी १२२ जागांची गरज आहे. गेल्या निवडणुकीत एनडीएने १२५ जागा जिंकल्या होत्या. यंदा सत्ताधाऱ्यांना त्यापेक्षा अधिक जागा मिळताना दिसत आहेत.

जेव्हीएस पोल्सच्या एक्झिट पोलनुसार एनडीएला १३५ ते १५० जागा मिळू शकतात. तर महागठबंधनला ८८ ते १०३ जागांवर यश मिळण्याचा अंदाज आहे. पीपल्स इनसाइटच्या एक्झिट पोलनुसार एनडीएला १३३ ते १४८ जागा मिळण्याची शक्यता आहे. तर महागठबंधनला ८७ ते १०२ जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

पीपल्स पल्सच्या एक्झिट पोलनुसार, एनडीएला १३३ ते १५९ जागा मिळण्याचा अंदाज आहे. तर महागठबंधनला ७५ ते १०१ जागांवर यश मिळू शकते.

### एक्झिट पोलचा कौल




दैनिक भास्करच्या पोलनुसार एनडीए १४५ ते १६० जागांवर बाजी मारु शकते. तर महागठबंधनला ७३ ते ९१ जागांवर समाधान मानावे लागू शकते. जवळपास सगळ्याच एक्झिट पोलमध्ये एनडीएला स्पष्ट बहुमत मिळेल असा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

वरील पाच एक्झिट पोलमधील आकड्यांची सरासरी काढल्यास एनडीएला १४८ जागा मिळू शकतात. तर महागठबंधनला ८८ जागा मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्यात सलग दुसऱ्यांदा एनडीएचे सरकार येण्याची दाट शक्यता आहे. नितीश कुमार गेल्या २० वर्षांपासून बिहारचे मुख्यमंत्री आहेत. ते तब्बल नऊवेळा मुख्यमंत्री झालेले आहेत.

## सिंधी कॉलनीत दुचाकी अपघात; एक जण जखमी

**सोलापूर :** सिंधी कॉलनी परिसरात निष्काळजीपणे चालविलेल्या दुचाकीने दुसऱ्या दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात प्रमोद गौतम पौळ (वय ४९, रा. प्लॉट क्र. ३, सम्राटनगर, मजरेवाडी, सोलापूर) हे गंभीर जखमी झाले. या प्रकरणी सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडली.

फिर्यादी पौळ हे त्यांच्या ताब्यातील दुचाकी (क्र. एमएच १३ एजी ७७७५) वरून गुरुनानक चौकाच्या दिशेने जात असताना, आरोपीने आपल्या मोटारसायकल (क्र. एमएच १३ एपी ४५८३) हायगतीने आणि निष्काळजीपणे चालवून त्यांच्या वाहनास जोराची धडक दिली. धडकेत पौळ यांच्या दोन्ही पायांना फ्रॅक्चर होऊन ते गंभीर जखमी झाले. अपघातानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. या घटनेचा तपास पोलीस हवालदार काळे यांच्याकडे सुरू आहे.

## सोलापुरात राष्ट्रवादी शरद पवार पक्षाला धक्का: प्रथमेश कोठे यांच्यासह चार माजी नगरसेवक भाजपात



प्रथमेश कोठे यांच्या भाजपा प्रवेशाप्रसंगी डावीकडून जयकुमार गोरे, रविंद्र चव्हाण आणि आ.देवेंद्र कोठे

> “मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून पालकमंत्री जयकुमार गोरे व थोरले बंधू आमदार देवेंद्र कोठे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. आजोबा स्व विष्णुपंत तात्या कोठे व माझे वडील स्व. महेश अण्णा कोठे यांचे सामाजिक व राजकीय कार्य अधिक जोमाने पुढे घेऊन जाण्यासाठी प्रयत्नशील राहीन. आमचा कोठे परिवार राजकारणात सुद्धा पुन्हा एकत्र आल्याचा आनंद आहे.
>
> **-प्रथमेश महेश कोठे**

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूरच्या राजकीय वर्तुळात मंगळवारी रात्री मोठी घडामोडी झाली आहे सोलापूरच्या राजकारणातील मोठा परिवार असलेल्या कोठे परिवारातील देवेंद्र कोठे सोलापूर शहर मध्ये विधानसभा मतदारसंघातून आमदार झाल्यानंतर आगामी सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोठे परिवारातील माजी महापौर स्व. महेश अण्णा कोठे यांच्या गटाचे नेतृत्व करत असलेले राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युवा नेते प्रथमेश कोठे यांच्या नेतृत्वात चार माजी नगरसेवकांनी मंगळवारी सायंकाळी मुंबईत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आहे.

राष्ट्रवादी शरद पवार गटाला हा मोठा धक्का मानला जात असून सोलापुरात भाजपबरोबरच आमदार देवेंद्र कोठे यांची ताकद वाढण्यास मोठी मदत झाली आहे.भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री जयकुमार गोरे व आमदार देवेंद्र कोठे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई प्रदेश कार्यालयात हा प्रवेश पार पडला. माजी नगरसेवक प्रथमेश कोठे यांच्यासह स्थायी समितीचे माजी सभापती विनायक कोंड्याल, माजी नगरसेविका कुमुद अंकाराम, माजी नगरसेवक विठ्ठल कोटा, माजी नगरसेवक शशिकांत कैंची तसेच जोशी समाज शहर अध्यक्ष युवराज सरवदे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष अक्षय वाकसे, राष्ट्रवादी युवकचे शहर उत्तर सरचिटणीस तुषार पवार, संतोष सोमा, आकाश भोसले आदींचा भाजपा प्रवेश झाला आहे.

सोलापुरात शत प्रतिशत भाजप साठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली आमदार देवेंद्र कोठे यांनी मोठी ताकद पणाला लावली आहे. काही दिवसापूर्वीच आमदार कोठे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीचे माजी महापौर पद्माकर काळे,दिलीप कोल्हे, बिज्जू प्रधाने, सुभाष डांगे, सुरेश पाटील, गुरुशांत धुत्तरगांवकर आदींनी प्रवेश केल्यानंतर आमदार कोठे यांचे चुलत बंधू आणि राष्ट्रवादी शरद पवार गटात असलेले माजी नगरसेवक प्रथमेश कोठे यांना भाजपात आणण्याचे आमदार कोठे यांचे प्रयत्न सुरू होते.

अखेर मंगळवारी या प्रयत्नाला अपेक्षेप्रमाणे यश आले आहे.प्रवेश केलेल्यापैकी बहुतांशजण हे कोठे परिवाराशी संबंधित आहेत. या प्रवेशामुळे राष्ट्रवादी शरद पवार गटाला मात्र मोठा धक्का बसला आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



धूर जरी दिसला तरी घाबरायला होतं!

संगम श्री डे
268-69-450

संगम श्री नाईट
290-10-569

कल्याण
335-16-790

मुंबई
670-37-890

## नगरपालिकेच्या धामधुमीत लवकरच ‘झेडपी’चाही बिगुल

**सोलापूर/विशेष प्रतिनिधी**

**राज्यासह सोलापूर जिल्ह्यात नगरपालिका आणि नगरपंचायत यांच्या निवडणुकीची धामधूम सुरू असतानाच झेडपीच्या निवडणुकांचा बिगूल लवकरच वाजणार असल्याचे वृत्त थडकले आहे. त्यामुळे झेडपीवर जावू पाहाणाऱ्या इच्छुकांना चेव सुटला आहे.**



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारीपूर्वी घेण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत. त्यानुसार, तीन टप्प्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींची घोषणा आयोगाकडून करण्यात येणार आहे. सध्या नगर परिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकींची प्रक्रिया सुरू आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारीपूर्वी घेण्यात याव्यात असे सुप्रीम कोर्टाने आदेश दिले आहेत. त्याानुसार गेल्या पाच वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका यामुळे मार्गी लागत आहेत. निवडणूक आयोगाने तीन टप्प्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींची घोषणा करण्यात येत आहे.

सध्या नगर परिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकींची प्रक्रिया सुरू आहे. यानंतर जिल्हा परिषदांच्या निवडणुकांची घोषणा होणार आहे. त्यानंतर महापालिकेच्याही निवडणुका जाहीर होतील.

राज्यातील ग्रामीण भागात सध्या नगर परिषद आणि नगरपंचायत निवडणुकांची आचारसंहिता सुरू आहे. या ठिकाणी २ डिसेंबरला मतदान झाल्यानंतर लगेच ३ डिसेंबरला मतमोजणी आहे. दरम्यान, यानंतर १८ नोव्हेंबरला जिल्हा परिषदेच्या निवडणुकींची घोषणा होण्याची शक्यता आहे, अशी राजकीय वर्तुळात आणि प्रशासनात चर्चा आहे. हिवाळी अधिवेशनही यंदा आचारसंहितेतच असणार आहे. विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबरपासून सुरू होणार आहे.

### आता कागदपत्रांसाठी धावपळ!

दरम्यान, विधिमंडळ सचिवालयाचे कामकाज २८ नोव्हेंबरपासून नागपुरात सुरू होणार असून, प्रशासनिक तयारीला गती मिळाली आहे. ३ डिसेंबरला मतमोजणी झाल्यानंतर आचारसंहिता संपुष्टात येईल. मात्र, १८ नोव्हेंबरला जिल्हा परिषद निवडणुकीची घोषणा झाल्यास अधिवेशन हे आचारसंहितेत जाईल. त्यामुळे सरकारला मोठ्या घोषणा करण्यावर मर्यादा असणार आहे.